उद्यानाला बकाल स्वरुप...

पंचवटीतील कोणार्क नगर येथील उद्यानाला बकाल स्वरुप प्राप्त झाले असून या उद्यानाची दुरुस्ती करावे, अशी मागणी नागरिक करीत आहेत. (छाया : सतिश देवगिरे)

सिडको महाविद्यालयाचे गिरणारेला शिबिर

नाशिक । बहुजन हिताय, बहुजन सुखाय उक्तीनुसार ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा पोहोचली पाहिजे, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपान कुशारे यांनी केले.

सिडको महाविद्यालयाच्या वतीने गिरणारे येथे नुकतेच विद्यार्थी उद्बोधन शिबिर झाले. प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. सीताराम निकम यांनी केले. प्रास्तविकामधून महाविद्यालयात होणाऱ्या विविध उपक्रमांची सखोल माहिती दिली. भूगोल विभागातील डॉ. एस.डी. पगार यांनी नवीन शिक्षण धोरण आणि यातील विषयासंदर्भात सविस्तर माहिती दिली. नवीन शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांच्या हिताचे कसे आहे हे पटवून दिले.उपप्राचार्य प्रा. सोमनाथ घुले यांनी विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर होणाऱ्या अंतर्गत व प्रॅक्टिकल परीक्षाबाबत आणि त्यातील गुणांबाबत तसेच परीक्षेचे नियोजन, परीक्षा फॉर्म भरताना घ्यावयाची काळजी आदी विषयांवर माहिती दिली. प्रा.योगिता करंजकर यांनी शिष्यवृत्तीविषयी विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली.

राष्ट्रीय सेवा योजना सिडको महाविद्यालय व गिरणारे ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने गिरणारे गावात नावलौकिक असलेल्या बालाजी मठामध्ये मठाधिपती महंत लालदासजी महाराज यांच्या उपस्थितीत वृक्षारोपणाचा कार्यक्रम झाला. यावेळी राष्ट्रपतीपदक पुरस्कार विजेते माणिक गायकर, मनीषा जाधव, उपसरपंच तानाजी गायकर , समाधान डोकफोडे, गिरनार ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या हस्ते मठातील प्रांगणात वृक्षारोपण केले. सूत्रसंचालन डॉ.अशोक भवर यांनी केले.

'आई' माझ्या शिक्षणाचा त्रास नको घेऊ!

पोलीस महिलेच्या मुलीची सुसाईड नोट लिहून आत्महत्या

नाशिक । प्रतिनिधी

'आई, तुला त्रास द्यायचा नाहीय, माझा शैक्षणिक खर्च फार आहे, तु टेंन्शन घेऊ नकोस, तुझी धावपळ होते', अशी हृदयद्रावक चिठ्ठी लिहून पोलीस अंमलदार महिलेच्या वीस वर्षीय विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या घटनेने पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

पूजा दीपक डांबरे (रा., विहंग अपा. विडी कामगारनगर, अमृतधाम, पंचवटी) असे विद्यार्थिनीचे नाव आहे. पूजा ही बारावी पास झाल्यावर तिने प्रथम वर्षासाठी महाविद्यालयीन शिक्षण सुरु केले होते. त्यातच वडिल विभक्त असल्याने कुटुंबात दोघी मायलेकी राहत होत्या. दरम्यान, संवेदनशील पूजाने कौटुंबिक स्थितीनुरुप जुळते घेतले. खचलेली असतानाच ती तणावात होती. आई पोलीस अंमलदार असल्याने तिला व आईला कौटुंबिक व नैतिक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत होत्या, पूजा ही आईवर जीवापाड प्रेम करत होती. मात्र, पूजाने शुक्रवारी(दि. १९) रात्री आठ वाजेपूर्वी घरातील हॉलमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना लक्षात येताच, तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तपासून मृत घोषित करण्यात आले. याबाबत आकस्मिक मृत्यूची नोंद आडगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

तपासाधिकाऱ्याची असंवेदनशीलता

या संबंधी अनेक माध्यमांसह सामाजिक कार्यकर्त्यांनी तपासाधिकारी व आडगाव पोलीस ठाण्यातील सहायक उपनिरीक्षक बाळासाहेब जाधव यांना वारंवार संपर्क केला असता त्यांनी फोन घेतले नाहीत. संपर्क झाला असता त्यांनी त्रोटक माहिती सांगून 'थोडावेळाने माहिती देतो' असे म्हणत असंवेदनशीलतेचा कळस गाठला.

आजचे कार्यक्रम

व्हीनस आर्ट अकॅडमीतर्फे गुरुवंदना ऊर्जा चित्रप्रदर्शन
स्थळ : कुसुमाग्रज स्मारक कलादालन, गंगापूर रोड
वेळ : सकाळी ११ ते रात्री ८ पर्यंत

पार्श्वगायक स्वर्गीय मुकेश यांच्या जयंतीनिमित्त अफलातून म्युझिक लव्हर्सतर्फे 'द लेजंड मुकेश' ही लोकप्रिय गाण्यांची मैफल
स्थळ : परशुराम साईखेडकर नाट्यगृह, शालिमार
वेळ : ६ वाजता

नाशिक जिल्हा तलवारबाजी असोसिएशन, डी. एस. एफ. आणि स्वर्गीय उत्तमराव ढिकले फाउंडेशन यांच्या वतीने १२ वर्षे आणि १४ वर्षे गटांच्या मुले आणि मुलींच्या जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेचे आयोजन

साल्हेर दुर्गाच्या रणसंग्रामाचे सामर्थ्य व स्थान यावर सखोल चर्चा करण्यासाठी परिसंवाद
स्थळ : आय.एम.आर.टी. कॉलेज ऑडिटोरियम, रावसाहेब थोरात सभागृहासमोर, मॅरेथॉन चौक
वेळ : सकाळी ११ वाजता

के. के. वाघ शिक्षण संस्थेचा संयुक्त पुण्यतिथी कार्यक्रम

नाशिक । के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या वतीने देवराम सयाजी वाघ, कर्मवीर काकासाहेब वाघ, दानशूर रतनशी हरिदास उदेशी, काकूशेठ उदेशी व सहकार महर्षी माधवराव उर्फ तात्यासाहेब बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरण कार्यक्रम मंगळवारी (दि.२२) साजरा करण्यात येणार आहे.

संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात कार्यक्रम पार पडणार आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार देवयानी फरांदे उपस्थित राहाणार आहेत. विशेष अतिथी म्हणून माजी आमदार अनिल कदम व मराठा विद्या प्रसारण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले उपस्थित असतील. कादवा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्रीराम शेटे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भुषविणार आहेत.

पदोन्नतीबद्दल संचालकांचा सत्कार

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक विभागातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण खात्यामधील मुख्य लिपिक पदाच्या गेल्या तीन वर्षांपासून रखडलेल्या पदोन्नती प्रमुख संचालक माधवी सरदेशमुख यांनी कार्यभार घेतल्यानंतर तात्काळ केल्याने सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

सरदेशमुख यांच्या आदेशानुसार नाशिक येथील सहसंचालक अनिल गावित यांनी देखील प्रथम प्राधान्याने व जलद गतीने कार्यवाही पूर्ण केली. विभागातील ५१ पात्र कर्मचाऱ्यांना तीन वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर मुख्य लिपिक पदावर पदोन्नती मिळाल्याने स्वातंत्र्यवीर सावरकर औद्योगिक प्रशिक्षण संस्था नाशिक येथे संचालक सरदेशमुख आल्या असता गावित, मंगेश मरकड, संजय पगारे, मनोज निकम यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी सत्कार करून आभार व्यक्त केले.

विद्या प्रबोधिनी प्रशालाच्या विद्यार्थ्यांचा सत्कार

नाशिक । प्रतिनिधी

विद्या प्रबोधिनी प्रशाला सी.बी.एस.ई. विभागातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ नुकताच झाला.

समारंभात श्रेयस चाकूरकर, नैतिक सोनवणे, नंदिनी चव्हाण, मनस्वी पवार, मोहित पाटील या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार जिल्हा परिषद शिक्षण अधिकारी प्रवीण पाटील तसेच सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी कार्यवाह मिलिंद वैद्य याच्या हस्ते करण्यात आला. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी दहावीला शिकविणाऱ्या सर्व शिक्षकांचा देखील सत्कार करण्यात आला. शालेय समितीचे अध्यक्ष दीपक जोशी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक गोविंद बोराडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन पूर्वा साळुंके, सिद्धी तांदळे यांनी केले.

एकल महिलांच्या मुलांना फी माफ व्हावी

दिव्य चेतना सोशल फाऊंडेशची मागणी

नाशिक । प्रतिनिधी

आठ लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या एकल महिलांच्या मुलांना शैक्षणिक फी माफ करण्यात यावी, अशी मागणी दिव्य चेतना सोशल फाऊंडेशनचे सचिव प्राचार्य प्रशांत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात केली आहे.

कोविड नंतर अनेक मुला मुलींनी आपले पालक गमावले. या सर्वांचे शिक्षण थांबू नये म्हणून नाशिकमधून १५ मित्र एकत्र येऊन दिव्य चेतना सोशल फाउंडेशन ही सेक्शन ८ संस्था काढली व नाशिक जिल्ह्यातील अडीचशेपेक्षा जास्त कोणत्याही कारणाने पालक गमावलेल्या व आर्थिक परिस्थिती नसलेल्या मुलांची शैक्षणिक जबाबदारी घेतली आहे. त्या अंतर्गत मुला-मुलींना तीस हजारापर्यंत शैक्षणिक फी दिली जाते. दोन हजार रुपये वहया पुस्तकांकरीता देतात. तसेच त्यांच्या मातेला नोकरी लावून देण्याचा प्रयत्न होतो. कौशल्य विकासाचे शिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी प्रयत्न केला जातो. मात्र इतर कोणत्याही कारणाने पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात आर्थिक अडचणीमुळे अनेक अडचणी उभ्या राहतात व बऱ्याचवेळा त्यांचे शिक्षण थांबते, असे होऊ नये यासाठी संस्था काम करत असून आता एकल महिलांच्या मुलांनाही शैक्षणिक फी माफ करण्यात यावी, म्हणजे त्यांचे शिक्षण उत्तम होऊ शकेल, असे मागणी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे.

तामसवाडी विद्यालयामध्ये साठे पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

नाशिक । प्रतिनिधी

तामसवाडी जनता विद्यालयामध्ये साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना पुण्यतिथी निमित्ताने विनम्र अभिवादन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक जी. एम.पोटे होते तर व्यासपीठावर एस. एल.पवार, आर. पी. बागल, एस. एस. जाधव, पी.व्ही. तांबे, टी.टी. कोर आदी उपस्थित होते. सुरुवात प्रतिमा पूजनाने करण्यात आली. सर्व मान्यवरांच्या हस्ते लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

अध्यक्षीय मनोगतात पोटे म्हणाले की, अण्णा भाऊ साठे हे मराठी लेखक, समाजसुधारक व प्रसिद्ध लोककवी होते. त्यांच्या फकिरा कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर सेवक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

स्थानिक भाव

सोने (प्रति १० ग्रॅम)	
२४ कॅरेट	९८५००
२२ कॅरेट	९०६२०
चांदी (प्रति किलो)	
११४०००	

करिअर मार्गदर्शन मेळावा

नाशिक । मन्सुरी पिंजारी जमात नाशिक, जिल्हा नाशिक यांच्या वतीने विद्यार्थी गुणगौरव व करिअर मार्गदर्शन सोहळा व समाज मेळावा आज रविवारीसकाळी १० वाजता जत्सा हॉल, अशोका मार्ग, नाशिक येथे होणार आहे.

या मेळाव्याचे प्रमुख अतिथी म्हणून शेखर गायकवाड, वसंतराव पुजारी यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, करिअर मार्गदर्शन व समाज संघटनावर चर्चा होणार आहे. समाजातील एकात्मता व उन्नतीसाठी उपाययोजना राबवण्याचा संकल्प घेण्यात येणार आहे.

पावसाची उघडीप; आता धुळीचा सामना...

गेल्या दोन दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली आहे. वाहनचालकांना रस्त्यावरील खड्ड्यांचा त्रास व धुळीचा सामना करावा लागत आहे. (छाया : सतिश देवगिरे)

बाजारभाव

फळभाज्यांचे प्रती जाळी दर

शेतमाल	किमान भाव	कमाल भाव	सरासरी भाव
टमाटा	२५०	४५०	३५०
वांगी	३००	५००	४००
फ्लॉवर	२००	३२५	३१७
कोबी	१५०	२२५	१८०
ढोबळी	५००	७२५	६००
कारले	६००	८००	७००
दोडका	८००	१०००	९००
गिलके	६००	९००	८००
भेंडी	४००	६००	५००
गवार	४००	८००	६००
काकडी	३००	५००	४००

कालचे कांदा भाव

	आवक (क्विं.)	किमान	कमाल	सरासरी
लासलगाव	१०९१०	५००	२००१	१३५१
विंचूर	बंद	---	---	---
निफाड	६८१०	५००	१४५०	१३५१
सायखेडा	४५३०	९००	१५००	१३००
पिंपळगाव	१६७००	८००	२०९०	१४५०

विशेष सुरक्षा विभागाला नापसंती

(पान १ वरुन) जात आहे. राज्याच्या विशेष सुरक्षा विभागाचे तत्कालीन विशेष पोलीस महानिरीक्षक अंकुश शिंदे यांनी स्वेच्छानिवृत्ती घेण्याआधी प्रतिनियुक्ती निवड प्रक्रियेसंदर्भातील आदेश जारी केले होते. आता उपअधीक्षक विश्राम अभ्यंकर यांनी १९ ते २७ जुलैपर्यंत अर्ज नोंदणीसाठी मुदतवाढ जाहीर केली आहे. शिंदे यांनीदेखील काही १८ जुलैपर्यंत मुदतवाढ दिली होती. मात्र, अर्जांना फार कमी प्रतिसाद मिळाला आहे. विशेष सुरक्षा विभागात राज्यात ४१० नि:शस्त्र अधिकारी नेमण्यात येणार आहेत. त्यामध्ये १९ पोलिस निरीक्षक, ३४ सहाय्यक निरीक्षक आणि ३५७ उपनिरीक्षकांचा समावेश असणार आहे. दरम्यान, निकषात बसणाऱ्या पोलीस अंमलदारांसह अधिकाऱ्यांचे अर्ज मागवण्यात आले आहेत. अर्ज दाखल केल्यावर शारीरीक चाचणी पोलिसांना पूर्ण करावी लागेल. त्यानंतर पात्र अर्जदारांना प्रशिक्षण देत परीक्षा घेतली जाईल. यानंतर एखादा अर्जदार अनुत्तीर्ण झाल्यास त्याची प्रतिनियुक्ती रद्द केली जाईल. त्यासाठी बऱ्याच वर्षांपासून प्रतिक्षेत पोलीस अंमलदारांनी अर्ज नोंदणी सुरू केली आहे. इच्छुकांना https://mhpolice.pristineportal.net/ या लिंकवर अर्ज सादर करण्याचे निर्देश राज्य गुप्तवार्ता विभागाने दिले आहेत. विशेष म्हणजे, ही नियुक्ती केवळ पाच वर्षांसाठीच राहणार आहे.

आगामी मोर्चा पाचपट असेल - जरांगे

(पान १ वरुन) मनोज जरांगे पाटील यांनी धनगर समाज आणि मराठा समाज कधीच वेगळे नव्हते आणि नसणार असे सांगितले. धनगर समाजाने मराठा आरक्षणाला पाठिंबा दिला असून, जर मराठ्यांच्या कुणबी नोंदी सापडत असतील तर त्याला विरोध का करायचा? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. ओबीसी बांधवही गरीब मराठ्यांच्या लेकरांचे कल्याण व्हावे असेच इच्छितात, असे जरांगे पाटील यांनी नमूद केले. मराठा आणि कुणबी एकच असून, ५८ लाख नोंदीचा अहवाल सरकारकडे आहे. त्यामुळे आता कुणबी प्रमाणपत्रांच्या अंमलबजावणीत कोणतीही अडचण येता कामा नये, असे ते म्हणाले.

२९ ऑगस्ट रोजी निघणारा मुंबई मोर्चा अंतरवलीतून निघेल आणि पैठण, शेवगाव, अहिल्यानगरमार्गे शिवनेरी जुन्नरला पहिला मुक्काम करेल. त्यानंतर माळशेज घाटातून कल्याण, चेंबूरमार्गे आझाद मैदान गाठेल. हा मोर्चा कोणालाही लक्ष्य करण्यासाठी नसून, केवळ मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आहे. जरांगे पाटील यांनी मीडियासमोर कधीही खोटे बोललो नसल्याचे सांगत या मोर्चात प्रचंड गर्दी असेल असा विश्वास व्यक्त केला.

हनी ट्रॅपमुळे सत्तांतर

(पान १ वरुन) पक्षनेत्यांकडे आहे. कुणाच्या वैयक्तिक आयुष्यात डोकावण्याचा कुणाला अधिकार नाही. म्हणून आपण चूप आहोत. मागच्या वेळेस शिंदे सरकार जे आले ते अशाच नाशिकच्या प्रकरणामुळे आले. शिंदेंच्या सरकार आले, जे सत्तापालट झाले ते सीडीमुळे झाले. एवढे मोठे ते प्रकरण आहे. अनेक ऑफिसर, अनेक मोठी माणसं त्यात आहेत. त्यावर खूप बोलण्याची गरज नाही, असे वडेट्टीवार म्हणाले.

आम्ही ती माहिती उघड केली तर लोकांना पाहण्यासाठी तिकीट लावावे लागेल, आणि ती खास आमंत्रित लोकांनाच दाखवली जाईल, इतकी ती गंभीर आहे. ज्यावेळेस आम्ही दाखवू त्यावेळेस आम्हाला दहा-वीस हजार रुपये असे तिकीटच लावावे लागेल. ते तिकीट लावूनच सर्व चित्र दाखवावे लागेल असेही विजय वडेट्टीवार म्हणाले. काँग्रेस नेते नाना पटोले यांनीही सभागृहात थेट पेनड्राईव्ह आणून दाखवला होता. संबंधित पेनड्राईव्हमध्ये हनी ट्रॅपचे प्रकरण कैद असल्याचा दावा नाना पटोले यांनी केला होता. पण ते आरोप मुख्यमंत्र्यांनी फेटाळले होते. नाना पटोले यांच्याकडून सरकारला काही माहिती मिळाली नसल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात सांगितले होते.

दूपार सत्रात फळभाज्या तेजीत

नाशिक । प्रतिनिधी

मार्केट यार्डात सकाळ,दुपार आणि संध्याकाळ या तिन्ही सत्रात भाजीपाला, फळभाज्यांची आवक कमी,जास्त होत आहे. मात्र आज (दि.१९) सकाळ सत्राच्या तुलनेत आवक अधित असूनही दूपारच्या सत्रात मार्केट यार्डाच्या मुख्य आवाराज टोमॅटो, काकडी, भेंडी, गिलके, दोडके, ढोबळी मिरची, कारले, वांगी यांच्या दरात प्रति जाळी वाढ झालेली होती. त्याचबरोबर दूपारी विक्री येणाऱ्या किरकोळ स्वरूपातील पालक, मेथी, शेपू, कोथिंबीर या पालेभाज्यांचे दरही किंचित वाढलेले होते. त्यामुळे घाऊक स्वरूपात खरेदी करणाऱ्या भाजीविक्रेत्यांना तेजीचा परिणाम जाणवत होता.

राजकीय क्षेत्रात मराठा समाजाचे वर्चस्व

(पान १ वरुन) मागास प्रवर्गातून (एसईबीसी) १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय तत्कालीन शिंदे सरकारने घेतला व तसा कायदा केला. तथापि, राज्यातील संपूर्ण आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्यामुळे मराठा आरक्षण कायद्याच्या कचाट्यात अडकले आहे. आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकांसह तब्बल १८ याचिका दाखल झाल्या आहेत. सर्व याचिकांवर यापूर्वी तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय, न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती फिरदोष पुनीवाला यांच्या पूर्णपीठापुढे अंतिम सुनावणी सुरु होती. तथापि, मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र उपाध्याय यांची बदली झाल्याने सुनावणी रखडली होती. नंतर आलेल्या नवीन मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे यांनी या आरक्षणाची सुनावणी घेण्यासाठी न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या नेतृत्वाखाली नवीन विशेष त्रिसदस्यीय पूर्णपीठ नेमले आहे. या पूर्णपीठाने आता मराठा आरक्षणाच्या सुनावणीला गती दिली आहे. शुक्रवारपाठोपाठ शनिवारी सलग दुसऱ्या दिवशी सुनावणी घेण्यात आली. दोन्ही सुनावणीमध्ये याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी युक्तीवाद केला आणि मराठा समाज मागास नसल्याचा पुनरुच्चार करुन १० टक्के आरक्षणाला विरोध केला.

शिवसेना उबाठा पक्षाचे रोजगार अभियान

इंदिरानगर । प्रतिनिधी

शिवसेना उबाठा गट सर्वसमावेशक युवक, युवतींसाठी रोजगार अभियान सुरू करण्यात आले आहे. यात अर्ज जमा करणे, छाननी करणे, संबंधित कंपनीमार्फत मुलाखत घेणे आणि नियुक्तीपत्र देणे या पद्धतीने उमेदवारांना थेट नोकरी देण्यात येणार असल्याची माहिती उपक्रमाचे संयोजक तथा पक्षाचे उपमहानगर प्रमुख विनोद दळवी, वैशाली दळवी यांनी दिली आहे.

कमीत कमी पाचवी आणि जास्तीत जास्त इतर जी शैक्षणिक पात्रता असेल त्यानुसार इच्छुक उमेदवारांना नोकरीची संधी मिळवून देण्यात येणार आहे.

सुशिक्षितांना काम या उद्देशानुसार महिंद्र राईज, हेअर,व्होल्टास,एलजी, जिओ आदी नामवंत कंपनीची संपर्क साधण्यात आला आहे. किमान १६ हजार ५०० ते २८ हजार रुपयांपर्यंत वेतन मिळेल, असे प्रयत्न केले जाणार असून काही कंपनीमार्फत राहणे, जेवण आणि बससेवेची सुविधा मिळणार आहे. पाचवी पास ते पदवीधर, डिप्लोमा, डिग्री, सर्व शाखा आयटीआय सर्व ट्रेडसाठी ही संधी असून नाशिकसह मुंबई आणि पुणे येथेदेखील नोकरीची संधी मिळणार आहे. यासाठी पक्षाच्या राणेनगर येथील जनसंपर्क कार्यालयात शैक्षणिक कागदपत्रांच्या सत्यप्रती आणि आधारकार्ड, फोटो, पॅनकार्ड, बँक पासबुकसह दि.२५ जुलैपर्यंत नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार होणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांकही उपलब्ध करून देण्यात आले आहेत.